परिशिष्ट "ड"

सुचना

जिल्हा न्यायालय कोल्हापूर या आस्थापनेवर लघुलेखक श्रेणी ३, कनिष्ठ लिपीक पदांच्या भरतीसाठी उमेदवार यांना मार्गदर्शक सुचना :-

१. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या आस्थापनेवरील लघूलेखक श्रेणी ३ व कनिष्ठ लिपीक पदांचे अर्हताकारी सेवाप्रवेश परीक्षेसाठी उमेदवारांची अल्पसूची बनवण्यासाठी समुचित पध्दतीचा अवलंब करण्याचे सर्व अधिकार जिल्हा न्यायालय स्वतःकडे राखुन ठेवत आहे. सदर परीक्षेचे प्रकार, रिक्त स्थिती, निवड प्रक्रियेच्या पध्दतीत बदल करणे, परीक्षा पुढे ढकलणे, परीक्षा रद्द करणे याबाबत किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कारणाबाबत अधिकार राखून ठेवत आहे. याबाबत कोणत्याही उमेदवाराला कोणत्याही प्रकारच्या दाव्यासंदर्भात प्रश्न विचारण्याचा अधिकार असणार नाही. त्यामुळे अल्पसूची संबंधी कोणतेही अभिवेदन जिल्हा न्यायालयाव्दारा विचारार्थ घेतले जाणार नाही.

२. उमेदवारांना प्रत्येक परीक्षा आणि मुलाखतीकरिता, दिलेल्या सुचित तारखांना, स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

३. ज्या उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलावले जाईल, त्याने मुलाखतीच्या वेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व अर्ज केलेल्या पदांनुसार त्यांच्या मूळ प्रती पडताळणीच्या उददेशाने सादर करणे आवश्यक आहे.

अ) अर्हता परीक्षा/ पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

ब) अर्हता परीक्षा/ पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.

क) पात्रतेच्या निकषात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहीत ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

ड) पात्रता निकषात नमूद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ किंवा आय. टी. आय. ने जारी केलेले इंग्रजी व मराठी शॉर्टहॅन्ड/टायपिंगमधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.

४. निवड समितीचे सदस्य, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील कार्यरत अधिकारी/कर्मचारी किंवा या निवड प्रक्रियेसंदर्भातील इतर कोणालाही व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत भेटण्याचा किंवा प्रभावित करण्याचा किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न करणारा उमेदवार अपात्र ठरेल. यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम असेल.

५. निवड/नियुक्त्या हया उमेदवारांनी सर्व परीक्षा व मुलाखतीमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेच्या क्रमाने काटेकोरपणे केल्या जातील.

६. सदर परीक्षेकरीता खालीलप्रमाणे इंग्रजी व मराठी फॉन्टचा वापर करणेचा आहे.

मराठी फॉन्ट :- Kruti Dev 055 Size 14

इंग्रजी फॉन्ट :- Arial or The Times New Roman or Bitstream Charater Size 12

७. परीक्षार्थींनी सदर परीक्षेच्या अद्यावत सुचना पाहणेसाठी जिल्हा न्यायालय, कोल्हापूर https://kolhapur.dcourts.gov.in/ या संकेतस्थळावर सुचना - सेवाप्रवेश/सेवाभरती या टॅबवर भेट देणेची आहे.

८. **परीक्षेची वेळ :-** लघुलेखक श्रेणी ३ पदाकरीता सकाळी ०८.१५ वाजता

कनिष्ठ लिपीक पदाकरीता दुपारी ०३.०० वाजता

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
कोल्हापूर

परिशिष्ट "अ १"

कनिष्ठ लिपीक या पदासाठी घ्यावयाच्या चाचणी परीक्षेचे स्वरुप

१. पात्र उमेदवारांची संगणकावर मराठी टंकलेखनाची १० मिनिटात (गती ३० श.प्र.मि.) टंकलिखीत करावयाच्या ३०० शब्दांच्या २० गुणांची मराठी टंकलेखन चाचणी घेणेत येईल. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्रानुसार मराठी भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करताना ५ चुकांसाठी १ गुण कापण्यात येईल. वगळलेला मजकुर चूक म्हणून गणली जाईल. एकाच शब्दांच्या स्पेलिंगमध्ये अनेकवेळा चुक झाली असल्यास ती एकच चुक म्हणून गणली जाईल.

२. मराठी टंकलेखन चाचणीमध्ये निवड समितीने ठरविलेले किमान आवश्यक गुण मिळवणारे (Cut-off marks) उमेदवारच इंग्रजी टंकलेखन चाचणीला बसण्यास पात्र ठरतील.

३. यानंतर पात्र उमेदवारांची संगणकावर इंग्रजी टंकलेखनाची १० मिनिटात (गती ४० श.प्र.मि.) टंकलिखीत करावयाच्या ४०० शब्दांच्या २० गुणांची मराठी टंकलेखन चाचणी घेणेत येईल.

४. इंग्रजी टंकलेखन चाचणीमध्ये निवड समितीने ठरविलेले किमान आवश्यक गुण मिळवणारे (Cut-off marks) उमेदवारच मुलाखतीसाठी पात्र ठरतील.

५. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्रानुसार मराठी भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करताना ५ चुकांसाठी १ गुण कापण्यात येईल. वगळलेला मजकुर चूक म्हणून गणली जाईल. एकाच शब्दांच्या स्पेलिंगमध्ये अनेकवेळा चुक झाली असल्यास ती एकच चुक म्हणून गणली जाईल.

६. मराठी टंकलेखन आणि इंग्रजी टंकलेखन चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणपत्तेच्या आधारे १:३ प्रमाणे पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

गुणांची विभागणी	इंग्रजी टंकलेखन	२० गुण
	मराठी टंकलेखन	२० गुण
	गोपनीय अहवाल	२० गुण
	स्पेशल रिपोर्ट	२० गुण
	मुलाखत	२० गुण
	एकूण गुण	**१०० गुण**

प्रभारी
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
कोल्हापूर

कनिष्ठ लिपीक

	रविवार दिनांक ०१.११.२०२६ इ. रोजी सकाळी वाजता कनिष्ठ लिपीक पदाचे उमेदवार जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे दुपारी ३.०० हजर राहतील.	
अ.	मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. पहिली तुकडी (अ.क्र. १ ते ३४)	दुपारी ४.०० ते दुपारी ४.१०
	प्रिंटस घेणेचा कालावधी	दुपारी ४.१५ ते दुपारी ४.३५
	मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. दुसरी तुकडी (अ.क्र. ३५ ते ६७)	दुपारी ०४.४० ते दुपारी ०४.५०
	प्रिंटस घेणेचा कालावधी	दुपारी ०४.५५ ते दुपारी ०५.१५
	पेपर तपासणी	दुपारी ०५.३० ते सायंकाळी ०६.३०
ब.	इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. पहिली तुकडी (अ.क्र. १ ते ३४)	सायंकाळी ०६.३५ ते सायंकाळी ०६.४५
	प्रिंटस घेणेचा कालावधी	सायंकाळी ०६.५० ते सायंकाळी ०७.१०
	इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. दुसरी तुकडी (अ.क्र. ३५ ते ६७)	सायंकाळी ०७.१५ ते सायंकाळी ०७.२५
	प्रिंटस घेणेचा कालावधी	सायंकाळी ०७.३० ते सायंकाळी ०७.५०
	पेपर तपासणी	सायंकाळी ८.०० ते सायंकाळी ८.३०
	मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशाप्रमाणे प्रभारी प्रबंधक व स्विय सहाय्यक यांचे मार्गदर्शनाखाली सकाळी ११.०० वाजलेपासून इंग्रजी टंकलेखन परीक्षेचे पेपर तपासणीचे काम नेमून दिलेल्या लघुलेखक श्रेणी–२ व ३ चे कर्मचारी करतील. सदर पेपर तपासणीचे कामावर नेमून दिलेल्या लघुलेखक श्रेणी–१ चे कर्मचारी नियंत्रण ठेवणेचे काम करतील. पेपरतपासणी चे काम पूर्ण झालेनंतर दिलेल्या गुणांचे मुल्यांकनाचे काम नेमुन दिलेले लघुलेखक श्रेणी–१ चे कर्मचारी करतील. पेपरतपासणी चे काम पूर्ण झालेनंतर दिलेल्या गुणांचे मुल्यांकनाचे काम नेमुन दिलेले लघुलेखक श्रेणी–१ चे कर्मचारी करतील. मुल्यांकनाचे काम पूर्ण झालेनंतर लघुलेखक श्रेणी–१ यांनी उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिका स्वतंत्र लखोटयात सिलबंद करणेसाठी संबंधीत न्यायीक अधिकारी यांचेकडे जमा करणेचे आहेत.	

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
कोल्हापूर